


दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १५३
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, मंगळवार, दि.१४ जानेवारी २०२५

## मुजोरी रिक्षाचालकांवर धडक कारवाई



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.१३, डोंबिवली (ठाणे) :** डोंबिवलीत वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या रिक्षाचालकांविरुद्ध उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, कल्याणच्या मार्गदर्शनाखाली विशेष कारवाई करण्यात आली. ठाकुर्ली रोड, ९० फूट रस्ता, टिळक चौक, आणि घरडा सर्कल येथे वाहन तपासणी मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेत उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. अनिल धात्रक आणि त्यांच्या टीममधील श्री. विनायक गुंजाळ, श्री. यशवंतराव आणि इतर कर्मचारी सहभागी झाले होते. तपासणीत २७ रिक्षा चालकांवर नियमभंगाचे प्रकरणे नोंदवण्यात आले आणि जवळपास २ लाख रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. अशा मोहिमांद्वारे नियम मोडणाऱ्या चालकांना रोखणे आणि रस्ते वाहतुकीतील शिस्तीला प्रोत्साहन देण्याचा उद्देश असल्याचे अधिकार्यांनी स्पष्ट केले. या मोहिमेमुळे नागरिकांनी उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाचे कौतुक केले असून वाहतुकीच्या सुरक्षिततेबाबत यामुळे जागरुकता वाढण्याची अपेक्षा आहे.

## नांदेडमध्ये केळी पिकाचे क्लस्टर निर्माण करण्यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करणार



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१३, मुदखेड (नांदेड) :** तालुक्यातील बारड येथे खा. रवींद्र पाटील चव्हाण यांनी केळी उत्पादक केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाशी सवांद साधत पिकविम्यासहीत विविध प्रश्नांसंदर्भात आवाज उठविण्याचे आश्वासन देऊन जळगावच्या धर्तीवर नांदेडमध्ये केळी पिकाचे क्लस्टर निर्माण करण्यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करणार असे गांभिर्य पूर्वक आश्वासन देऊन शेतकऱ्यांच्या अडीअडचणी जाणुन घेतल्या

बारड येथे खा. रवींद्र चव्हाण यांच्या धावत्या भेटीत दि. ११ शनिवार रोजी सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पोचम्मा देवीची सामुहिक म हाआरती करण्यात आली. कै. स्वा. से. साहेबराव बारडकर यांच्या निवासस्थानी सुनील देशमुख व अँड संदीप देशमुख यांच्यावतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी जि. प. सदस्य प्रल्हादराव सोळुंके होते. माजी सभापती संजय बेळगे, जिल्हा प्रमुख बबन बारसे, स्वाभिमानीचे अध्यक्ष हनुमंत राजेगोरे, कैलास गोडसे, लक्ष्मण देवदे, प्रा संदीपकुमार देशमुख, उपसरपंच पांडुरंग शिंदे, मोहम्मद गौस, शिवानंद शिप्परकर, बाळासाहेब आंबेगावकर, माधव हामंद यांच्यासह शेतकरी व महाविकास आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते.

केळी उत्पादक शेतकरी शिष्टमंडळाच्या यांच्या वतीने जिल्हाध्यक्ष हनुमंतराव राजेगोरे, बालाजी कल्याणकर, विश्वनाथ पवार, भगवान पवार, राजेश पवार, दादा कल्याणे, अरविंद क्षीरसागर यांच्या वतीने खा. रवींद्र चव्हाण यांना निवेदन देण्यात आले. यावेळी खा. चव्हाण यांनी लवकरच जिल्हाधिकारी यांच्या समक्ष केळी पीक विम्या संदर्भात बैठक घेण्याचे आश्वासन दिले. या भागात केळीचे उत्पादन जास्त असल्याने शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढीसाठी केळीचे क्लस्टर निर्माण करून अधिकाधिक सोयी सुविधा पुरविण्याचा विधायक प्रयत्न करू असे आश्वासन खा. रवींद्र चव्हाण यांनी यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक काँग्रेस तालुकाध्यक्ष प्रतापराव देशमुख यांनी केले सूत्रसंचालन प्रा. संदीपकुमार देशमुख आणि आभार माजी सरपंच शीनिवास महादवाड यांनी मानले

यावेळी सरपंच ज्ञानेश्वर गोवडेवाड, बळवंत पाटील, शिवाजी वडजे, तेजस जाधव, सुर्यकांत चौदंते, सटवाजी पांडागळे, आकाश सोनटक्के, अनुराग बारडकर, भीमराव आठवले, गजानन कऱ्हाळे, आनंदा कांबळे, महेश देशमुख, दत्ता कदम उपस्थित होते.

## बदला घेण्यासाठी पिस्तूल बाळगणारा गजाआड

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१३, पुणे :** जमिनीच्या वादातून चुलत मामाने धमकी दिल्याच्या रागातून बदला घेण्यासाठी पिस्तूल बाळगणाऱ्या तरुणाला गुन्हे शाखेने अटक केली. त्याच्याकडून देशी बनावटीचे पिस्तूल आणि काडतुसे जप्त करण्यात आली. तरुणाला पिस्तूल देणाऱ्या एकाला अटक करण्यात आली.

आकाश बळीराम (वय २४, रा. नवशा मारुती मंदिराजवळ, सिंहगड रस्ता) असे अटक केलेल्याचे नाव आहे. आरोपी आकाश याला पिस्तूल देणारा सुभाष बाळू मरगळे (वय २४, रा. जाधवनगर, वडगाव बुद्रुक) यालाही अटक करण्यात आली. एरंडवणे भागातील डीपी रस्त्यावर आकाश थांबला होता. त्याच्याकडे देशी बनावटीचे पिस्तूल असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या युनिट तीनचे पोलीस कर्मचारी ज्ञानेश्वर चित्ते यांना मिळाली. सापळा लावून पोलिसांनी आकाशला पकडले. त्याची झडती घेण्यात आली. त्याच्याकडून देशी बनावटीचे पिस्तूल आणि काडतूस जप्त करण्यात आले. आरोपी आकाशचे चुलत मामाबरोबर जमिनीच्या मालकीवरुन वाद झाले होते. मामाने आकाशला जिवे मारण्याची धमकी दिली होती. त्यामुळे त्याने मामाचा बदला घेण्यासाठी सुभाष मरगळे याच्या मध्यस्थीने हडपसरमधील एकाकडून पिस्तूल विकत घेतल्याची कबुली पोलिसांना दिली. अतिरिक्त पोलीस आयुक्त शैलेश बलकवडे, उपायुक्त निखिल पिंगळे,सहायक आयुक्त गणेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक रंगराव पवार, ज्ञानेश्वर ढवळे, शरद वाकसे, संजीव कळंबे, सुजीत पवार, ज्ञानेश्वर चित्ते, गणेश शिंदे, सोनम नेवसे यांनी ही कामगिरी केली.

# आज हवा तुम्हारी हैं, कल का तुफान छगन भुजबळांचा इशारा



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१३, शेगाव :** आपल्यावर अन्याय होत आहे. पण आपण अद्याप खचलेलो नाही, अजून लढाई संपलेली नाही. आज हवा तुम्हारी है, कल का तुफान हमारा है, असा अर्थपूर्ण शेर सादर करीत राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा माजी मंत्री छगन भुजबळ यांनी येथे रविवारी पार पडलेल्या एका कार्यक्रमात आपण लढत राहणार असल्याचा निर्धार बोलून दाखविला. छगन भुजबळ यांनी या शेरोशायरीतून नेमका कोणाला इशारा दिला, याबाबत आता राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव येथे आयोजित राजस्तरीय माळी समाज उपवर युवक-युवती परिचय संम ेलनात मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी पोटजाती विसरून एकत्र येण्याचे आवाहन त्यांनी समाज बांधवाना केले. ओबीसींचा दीर्घ लढा अजून संपलेला नाही. यासाठी सर्व ओबीसी समूहांनी एकत्र येण्याची गरज आहे, असे आवाहन त्यांनी केले.

**जालन्याचा गडी ऐकायला तयारच नाही, उपोषण त्यांचा छंदच**

मराठा आरक्षणाला आमचा (ओबीसींचा ) विरोध नाही. त्यांना वेगळे आरक्षण द्यावे एवढीच आमची मागणी आहे. याचे कारण ओबीसी प्रवर्गात अगोदरच पावणेचारशे जाती आहेत, त्यात त्यांची भर पडली तर ना धड आम्हाला आरक्षण मिळेल ना मराठा बांधवांना लाभ होईल. मात्र जालन्याचा गडी काही ऐकायलाच तयार नाही. मुळात त्यांना आरक्षणाम धल फारस कळतच नाही, असा टोला छगन भुजबळ यांनी मराठा आरक्षण आंदोलनाचे प्रणेते मनोज जरांगे पाटील यांना नाव न घेता लगावला. आरक्षण म्हणजे हमखास शासकीय नोकरी, असा त्यांचा समज असून उपोषण म्हणजे त्यांचा छंद असल्याची बोचरी टीकादेखील छगन भुजबळ यांनी केली.

**दलित, आदिवासींना अनुदान, पण ओबीसींना नाही...**

केंद्र आणि राज्य सरकारकडून दलित, आदिवासी समूहांना अनुदान मिळते, तसे ओबीसीना मिळत नाही. मी मराठा समाजाच्या विरोधात नाही, पण त्यांना वेगळे आरक्षण द्यावे, एव्हढेच माझे म्हणणे आहे. मागील काळात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे यांनी मांडलेल्या मराठा आरक्षणच्या ठरावांना मी पाठिंबाच दिला होता, याचे स्मरणही त्यांनी यावेळी करून दिले.

**जातनिहाय जनगणना करा अथवा ओबीसी ५४ टक्के असल्याचे मान्य करा**

शासनाने जातनिहाय जनगणना करावी, अन्यथा ओबीसींची लोकसंख्या ५४ टक्के आहे, हे मान्य व जाहीर करावे, अशी रोखठोक मागणी छगन भुजबळ यांनी केली. जातनिहाय जनगणनेचा घोळ मागील अनेक वर्षापासून सुरू आहे.

जेव्हा जेव्हा ओबीसींनी न्यायालयात जावून काही मागणी केली तेव्हा तेव्हा त्याच्या विरोधात कुणी न कुणी उभ राहिले आहे. संविधानाने आठ हजार जातींची आदिवासी, दलित, ओपन व ओबीसी अशी वर्गवारी केली आहे. शासनाला काही द्यावयाचे असेल तर ते तुम्हाला माळी म्हणून नाही तर ओबीसी म्हणून देणार. या आधारावर आरक्षण मागावयास गेले तर न्यायालय विचारतो की तुमची संख्या किती? १९३३ मध्ये ब्रिटीशांनी जातनिहाय जनगणना केली होती, त्यावेळी ओबीसींची लोकसंख्या ५४ टक्के होती. आज लोकसंख्या वाढली आहे, तरी आमची संख्या तेवढीच आहे, असे आम्ही म्हणतो. मात्र, शासनाला ते मान्य नाही. त्यामुळे जातनिहाय जनगणना करावी, यासाठी आम्ही वारंवार शासनाकडे मागणी करत असल्याचे त्यांनी सांगितले.

## पुणे एसटीच्या ताफ्यात २०० नवीन इलेक्ट्रिक बस, चार्जिंग स्टेशनची क्षमता वाढणार

### पुणे विभागाच्या ताफ्यात येत्या वर्षभरात २०० इलेक्ट्रिक बस येणार

**अक्षराज : प्रमोद दिवेकर**

**दि.१३, पुणे :** महाराष्ट्र राज्य परिवहन म हामंडळांतर्गत (एसटी) पुणे विभागाच्या ताफ्यात येत्या वर्षभरात २०० इलेक्ट्रिक बस येणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर, पूर्वीपेक्षा जास्त बस चार्जिंग करण्यासाठी चार्जिंग स्टेशनची क्षमता वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. प्रस्तावित स्वारगेट, दापोडी 'चार्जिंग स्टेशन्स'वर एकाच वेळी ३६ बस चार्ज होणार आहेत. त्यामुळे प्रवाशांना ताटकळत उभे राहावे लागणार नाही.

केंद्र शासनाच्या निर्देशांनुसार, आयुर्मान संपलेली १५ वर्षांपुढील सरकारी वाहने मोडीत काढण्यात येत आहेत. तसेच, पर्यावरणपूरक इलेक्ट्रिक बसची संख्या वाढविण्यावर भर देण्यात येत आहे. त्यानुसार, राज्य सरकारनेही एसटी महामंडळातील जुन्या बस मोडीत काढून इलेक्ट्रिक बस वाढविण्यावर भर दिला आहे. त्यामुळे, एसटी महामंडळात येत्या वर्षभरात पाच हजार इलेक्ट्रिक बस दाखल करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. 'येत्या वर्षभरात पुणे विभागात २०० इलेक्ट्रिक बस टप्प्याटप्प्याने दाखल होतील.

सध्या पुणे विभागात ६६ इलेक्ट्रिक बस आहेत. या बसचे चार्जिंग शंकरशेठ रस्त्यावरील मुख्य कार्यालयाच्या ठिकाणी होते. अचानक उद्भवलेल्या तांत्रिक अडचणींम ुळे किंवा चार्जिंगसाठी प्रतीक्षा करावी लागत असल्याने




बसचे वेळापत्रक कोलमडते व प्रवाशांना ताटकळत उभे रहावे लागते. त्या पार्श्वभूमीवर शहराच्या विविध भागांम ध्ये 'चार्जिंग स्टेशन' वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे,' असे पुणे एसटी महामंडळाचे विभाग नियंत्रक प्रमोद नेहूल यांनी सांगितले.

'स्वारगेट आणि दापोडी येथे 'चार्जिंग स्टेशन' उभारण्यासाठी आवश्यक परवानग्यादेखील घेण्यात आल्या आहेत. त्यानुसार प्रत्येक चार्जिंग स्टेशनवर सात ते आठ बस चार्ज होतील, असे नियोजन करण्यात आले होते. मात्र, येत्या दोन दिवसांत नव्याने १५ बस ताफ्यात दाखल होणार असल्याने 'चार्जिंग स्टेशन'वर ताण येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

शिवाय, वर्षभरात इतर बस टप्प्याटप्प्याने जरी दाखल होणार असल्या, तरी हा ताण वाढत जाणार असल्याने स्वारगेट आणि दापोडी येथील 'चार्जिंग स्टेशन'वरील बस चार्ज करण्याची क्षमता पूर्वीपेक्षा अधिक वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार, प्रत्येक 'चार्जिंग स्टेशन'वर एका वेळी १८ बस चार्ज होतील, अशा पद्धतीने ३६ चार्जिंग केंद्र सुरू करण्याबाबतचा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविण्यात आला होता. या बदलाला मान्यता मिळाली असून, उच्च दाबाचा विद्युत पुरवठा करणाऱ्या भूमिगत वाहिन्या टाकण्यासाठी महावितरण कंपनीला सूचना करण्यात आल्या आहेत. त्यानुसार आवश्यक परवानग्या प्राप्त करून लवकरच विद्युतपुरवठाही सुरू करण्यात येईल,' असेही त्यांनी नमूद केले.

पुणे विभागांतर्गत पुणे ते छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नाशिक, कोल्हापूर आणि सोलापूर म ार्गांवर ई-शिवाई सुरू करण्यात आली आहे. कोल्हापूर आणि सातारा मार्गांवर इलेक्ट्रिक बस सुरू करण्यात येणार आहेत. सोलापूर मार्गावरून धावणाऱ्या बस शंकरशेठ रस्त्यावरील चार्जिंग स्टेशनवर, कोल्हापूर, सातारा सांगली मार्गावरून येणाऱ्या बस स्वारगेट येथील 'चार्जिंग स्टेशन' येथे चार्ज होतील, तर नाशिक, धुळे, तसेच उत्तर महाराष्ट्रातून येणाऱ्या बस दापोडी येथील 'चार्जिंग स्टेशन'मध्ये चार्ज होतील. त्यामुळे वेळेची बचत होऊन प्रवाशांना वेळेत बस उपलब्ध होतील, असे नियोजन करण्यात येत आहे.

## पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी पर्यटन पोलीस नेमणार पर्यटन प्रकल्प गतीने पूर्ण करावे - मुख्यमंत्री फडणवीस

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१३, मुंबई :** पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी राज्यात पर्यटन पोलीस नेमण्यात येणार असून नाशिक येथील राम-काल पथ विकास, आणि सिंधुदुर्ग (मालवण) येथील समुद्रातील पर्यटन हे प्रकल्प वॉररूमशी जोडण्यात येतील, केंद्र व राज्य शासनाकडून राबविण्यात येणारे पर्यटन प्रकल्प गतीने पूर्ण करण्यास प्राधान्य द्यावे. यासह राज्य लोकसेवा हक्क कायद्यांतर्गत पर्यटन विभागाच्या १४ सेवा 'आपले सरकार' संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे आगामी शंभर दिवसात पर्यटन विभागाने करावयाच्या कामकाजाचा आढावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी घेतला. यावेळी पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, मुख्य सचिव सुजाता सौनिक,पर्यटन विभागाचे प्रधान सचिव अतुल पाटणे, पर्यटन संचालक डॉ बी. एन. पाटील, महाराष्ट्र पर्यटन



विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक मनोज सूर्यवंशी यांसह विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, शासनाकडून अनुदानित प्रकल्पामध्ये नाशिक येथील राम - काल पथ विकास, सिंधुदुर्गातील मालवण येथील पाण्याखालील सागरी पर्यटनाचा अनुभव, स्वदेश दर्शन अंतर्गत आंबेगाव पुणे येथे पुरंदर शिवसृष्टी ऐतिहासिक थीम पार्क उभारणे, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पर्यटन विकास, अजंठा वेरूळ पर्यटन विकास ही कामे सुरू करून त्याला गती देण्यात येणार आहे. स्वदेश दर्शन २.० अंतर्गत अहिल्यानगर येथे किल्ल्यावरील पर्यटन आकर्षणासाठी उपक्रम राबविण्या संदर्भातील कामे तातडीने पूर्ण करावी. राज्याच्या प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत अमृत सांस्कृतिक वारसा पालघर येथील आदिवासी विकास पर्यटनाला चालना देणे, शिवसृष्टी थीम पार्क राज्यातील पाच ठिकाणी उभारणे, पंढरपूर येथे सभा मंडप स्कायवॉक या सर्व कामांसाठी सल्लागार नेमून ही कामे तात्काळ सुरू करण्यात यावीत असे निर्देशही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिले.

पर्यटन विभागाने ३१ मार्चपूर्वी उद्योग प्रमाणपत्र, कृषी पर्यटन युनिट नोंदणी प्रमाणपत्र ,साहसी पर्यटन युनिट नोंदणी प्रमाणपत्र, कॅराव्हॅन पर्यटन नोंदणी प्रमाणपत्र, आई महिला उद्योजकता विकास कार्यक्रमांतर्गत नोंदणी, पर्यटन व्हिलाची नोंदणी, पर्यटन अपार्टमेंटची नोंदणी प्रमाणपत्र, होम स्टेच नोंदणी प्रमाणपत्र, व्यवसायिक गृहाची पर्यटन नोंदणी प्रमाणपत्र या नवीन सेवा लवकरात लवकर सुरू कराव्यात असेही मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी सांगितले.

अक्षराज

२ | बुलडाणा, मंगळवार, दि.१४ जानेवारी २०२५ | विविधा

## संपादकीय

### राष्ट्रीय भूगोल दिन

आज १४ जानेवारी, आजचा दिवस संपूर्ण देशात राष्ट्रीय भूगोल दिन म्हणून साजरा केला जातो. १४ जानेवारी हा दिवस राष्ट्रीय भूगोल दिन म्हणून साजरा केला जातो हे खूपच कमी लोकांना माहीत आहे. भूगोल हा विषय आपण शालेय जीवनापासून शिकत आलो असूनही भूगोलाचे परिपूर्ण ज्ञान आपल्याला अजूनही मिळवता आले नाही. डॉ सी डी देशमुख हे भूगोल विषयातील अत्यंत जाणकार व्यक्ती मानले जातात. त्यांचे भूगोलाचे ज्ञान अफलातून होते त्यामुळे त्यांना भूगोल महर्षी असे म्हटले जाते. भूगोल महर्षी डॉ सी डी देशमुख यांचा १४ जानेवारी हा जन्मदिवस. भूगोल विषयात त्यांनी केलेले कार्य अतुलनीय असे आहे. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा दिवस राष्ट्रीय भूगोल दिवस म्हणून साजरा केला जातो.

भूगोल दिनाच्या निमित्ताने विविध उपक्रम साजरे केले जातात. भूगोल या शब्दाचा सरळ अर्थ पृथ्वीचा गोल असा होतो. भूगोल हा शब्द इंग्रजीतील ऋॠसॲरहॢ या शब्दासाठी पर्याय वापरला जातो. लॅटिन वरुन आलेल्या या शब्दाचा अर्थ 'भूवर्णन शास्त्र' पृथ्वीवरील भौतिक व मानवी पर्यावरणातील रचना, क्रिया व आंतरक्रिया यांचा अभ्यास म्हणजे भूगोल असे स्थूलमानाने मानले जाते. भूगोल म्हणजे मानव व पर्यावरण यांचा संबंध शोधणारे शास्त्र अशी देखील भूगोलाची व्याख्या केली जाते. भूगोलाची तीन गटात विभागणी केली आहे. १ ) प्राकृतिक भूगोल २ ) मानवी भूगोल ३) प्रादेशिक भूगोल प्राकृतिक भूगोलात भूरुप शास्त्र, हवामान शास्त्र, जैविक शास्त्र यांचा समावेश होतो. यासोबतच किनारी प्रदेश, खनिज शास्त्र आणि नैसर्गिक आपत्ती यांचाही प्राकृतिकभूगोलात समावेश होतो.

मानवी भूगोलात ऐतिहासिक भूगोल, सांस्कृतिक व सामाजिक भूगोल, लोकसंख्या, आर्थिक व राजकीय भूगोलाचा समावेश होतो प्रादेशिक भूगोलात पर्यावरणाचे व्यवस्थापन आणि विविध संसाधन स्तोत्रांचे जनन व संवर्धन यांचा समावेश होतो. भूगोलाच्या सखोल सविस्तर अभ्यासात विविध पद्धतींचा समावेश केला जातो. प्रत्यक्ष क्षेत्र निरीक्षण, नकाशे यांना तर भूगोलात महत्वाचे स्थान आहेच पण आजकाल दुरसंवेदी कृत्रिम उपग्रह, ड्रोन कॅमेरे, हवाई चित्रीकरण यांनी भूगोलाच्या निरिक्षण क्षमतेत भर घातली आहे. मानवी जीवनात भूगोलाचे महत्व अनन्यसाधारण आहे. आपण जगतो ते जग त्याचे स्वरूप, विविध भूप्रदेश, देश, तेथील लोकजीवन यांचे ज्ञान आपल्याला भूगोलामुळेच होते.

### हळदी-कुंकू समारंभांत स्त्री हिताचे कार्यक्रम व्हावेत !

मकरसंक्रांत ते रथसप्तमी या काळात जसे घरोघरी हळदी-कुंकू समारंभ केले जातात तसे उत्सव मंडळे, राजकीय नेते, महिला संघटना यांच्या वतीने सार्वजनिक हळदी-कुंकूही आयोजित केले जातात. सार्वजनिक हळदी कुंकू समारंभ साजरा करताना आयोजकांकडून स्त्रियांना आकर्षित करण्यासाठी गाण्यांच्या भेंड्या, संगीत खुर्ची, नाव घेण्याच्या स्पर्धा यांसारखे मनोरंजनाचे कार्यक्रम हळदी कुंकू समारंभाच्या सोबतीला ठेवले जातात. यातून मनोरंजनाखेरीज अन्य काहीच साध्य होत नाही. सध्याची सामाजिक स्थिती पाहता स्त्रियांवरील अत्याचाराचा आलेख दिवसागणिक चढतो आहे. पाश्चिमात्य संस्कृतीच्या प्रभावामुळे आणि आधुनिकतेच्या नावाखाली सध्याच्या मुली भारतीय संस्कृतीपासून दुरावू लागल्या आहेत. लव्ह जिहाद सारखे संकट प्रत्येक क्षेत्रात सावज शोधत आहे. अशावेळी स्त्रीशक्तीचा केवळ मनोरंजनामध्ये अपव्यय करण्याऐवजी स्त्रियांना सर्वार्थाने सक्षम होण्यासाठी प्रेरणा देणाऱ्या कार्यक्रमांचे आयोजन केल्यास स्त्रियांना अधिक लाभ होईल. हिंदू धर्माची आणि प्राचीन अशा भारतीय संस्कृतीची महती सांगणारी व्याख्याने, धार्मिक कृतींचे महत्व सांगणारी प्रवचने आणि संकटकाळात स्वतःचे रक्षण करण्यास समर्थ बनण्यास शिकविणारी स्वसंरक्षण प्रशिक्षणाची प्रात्यक्षिके यांसारख्या उपयुक्त कार्यक्रमाचे आयोजन करायला हवे, जेणेकरून हळदी कुंकूंच्या निमित्ताने एकत्र येणाऱ्या स्त्रिया भविष्यात एकमेकांच्या साहाय्यासाठीही संघटित होतील. हळदी कुंकू समारंभाच्या निमित्ताने स्त्रिया मोठ्या प्रमाणात एकत्र येतात त्यामुळे यंदाच्या सार्वजनिक हळदी कुंकू समारंभामध्ये केवळ मनोरंजनात वेळेचा अपव्यय न करता स्त्री हिताच्या दृष्टीने कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत !


**- जगन घाणेकर, घाटकोपर मुंबई**

# पहिलेवहिले भारतीय अंतराळवीर

राकेश शर्मा यांचा जन्म दि.१३ जानेवारी १९४९ रोजी पटियाला, पंजाब राज्य, भारत येथे झाला. एक भारतीय लष्करी वैमानिक आणि अंतराळवीर, अंतराळातील पहिले भारतीय नागरिक आहेत. सन १९७०मध्ये शर्मा भारतीय हवाई दलात वैमानिक म्हणून रुजू झाले. सन १९७१च्या बांगलादेश युद्धात त्यांनी मिग-२१मध्ये २१ लढाऊ मोहिमा उडवल्या. सन १९८२मध्ये त्यांची सोव्हिएत-भारतीय संयुक्त अवकाशयानासाठी अंतराळवीर म्हणून निवड झाली. दि.३ एप्रिल १९८४ रोजी त्यांनी दोन सोव्हिएत अंतराळवीर, कमांडर युरी मालीशेव्ह आणि फ्लाइट इंजिनियर गेनाडी स्ट्रेकालोव्ह यांच्यासोबत सोयुझ टी- ११वर उड्डाण केले, ते अंतराळ स्थानक सॅल्युट ७वर गेले. तेथे शर्मा यांनी अंतराळातून भारताचे छायाचित्रण आणि अभ्यासासाठी व्यायामाचा समावेश असलेले प्रयोग केले. वजनहीनतेच्या वेळी योगाचे शरीरावर होणारे परिणाम . हे मिशन जवळपास आठ दिवस चालले आणि शर्मा आणि त्यांचे क्रू सोबती ११ एप्रिल रोजी कझाकस्तानमध्ये दाखल झाले. सन १९८७मध्ये ते भारतीय कंपनी हिंदुस्तान एरोनॉटिक्समध्ये मुख्य चाचणी पायलट म्हणून रुजू झाले. सन २००१मध्ये त्यांनी हिंदुस्थान एरोनॉटिक्स सोडले आणि बंगलोर- बेंगळुरू येथील प्रक्रिया-व्यवस्थापन कंपनी, ऑटोमेटेड वर्कफ्लोच्या बोर्डाचे अध्यक्ष झाले.

राकेश शर्मा पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्याशी अंतराळातून बोलत होते. अंतराळातून भारत कसा दिसतो? या प्रश्नाला त्यांनी सारे जहाँसे अच्छा हिंदोस्ताँ हमारा असे अभिमानी उत्तर दिले होते. पतियाळात जन्मलेले राकेश भारतीय वायू दलात वैमानिक होते. नंतरच्या काळात त्यांचा अशोक चक्र देऊन सन्मान केला गेला.

राकेश शर्मा हे भारतीय एअर फोर्समध्ये विंग कमांडर होते. वयाची २३ वर्षे पूर्ण करण्यापूर्वीच त्यांनी मिग- २१ या फायटर जेटमधून २१ वेळा उड्डाण केले होते. भारताचे पहिले अंतराळवीर राकेश शर्मा यांचा आज वाढदिवस आहे. दि.१३ जानेवारी १९४९ रोजी पटियालामध्ये त्यांचा जन्म झाला होता. दि.३ एप्रिल १९८४ रोजी अंतराळात पोहोचणारे पहिले भारतीय होण्याचा मान त्यांनाच मिळाला होता. सुमारे आठ दिवस ते अंतराळात राहिले होते. सन १९८२ साली त्यांची अंतराळ यात्रेसाठी निवड झाली. इस्रो आणि सोव्हिएत संघ यांच्या संयुक्त मोहिमेंतर्गत सोयूज टी-११ या यानातून ते अंतराळात गेले होते.




सारे जहाँ से अच्छा.., सोयूज टी-११ मधील क्रूसोबत एका जॉइंट कॉन्फरन्समध्ये भारताने पहिल्यांदाच अंतराळातील आपल्या नागरिकासोबत गप्पा मारल्या होत्या. यावेळी भारताच्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी विचारलं होतं, की अंतराळातून भारत कसा दिसतोय? यावेळी उत्तर देताना राकेश शर्मा हिंदीतून म्हणाले होते, सारे जहाँ से अच्छा..!

पुढचं वर्षही गाजवणार 'इस्रो'; पहिल्या दिवसापासूनच होणार मोहिमांची सुरुवात!

राकेश शर्मांनी एका मुलाखतीमध्ये सांगितलं होतं, की सोयूज यानाच्या प्रक्षेपणाच्या दिवशी त्यांना अगदीच 'बोरिंग' वाटत होतं. या क्षणाचा सराव त्यांनी बऱ्याच वेळा केला होता. त्यामुळे त्या दिवशीही अगदी रुटीन असल्याप्रमाणेच सगळं पार पडलं, असं ते सांगतात. ते सध्या काय करतात? या आपल्या प्रश्नाचे उत्तर - राकेश शर्मा हे सध्या कुन्नूर नावाच्या एका छोट्या गावात आपल्या पत्नीसोबत राहतात. प्रसिद्धीच्या झगमगाटापासून दूर अगदी साधं आयुष्य ते जगत आहेत. अर्थात, ते अंतराळ मोहिमांपासून नक्कीच दूर झाले नाहीत. ते सध्या इस्रोच्या गगनयान मोहिमेसाठी सल्लागार म्हणून मदत करत आहेत. गगनयान मोहिमेच्या माध्यमातून भारत पहिल्यांदाच स्वतः स्पेसमध्ये अंतराळवीर पाठवणार आहे, हे विशेष!

**अंतराळवीर मा.राकेशजी शर्मा यांना वाढदिवसाच्या अनंत कोटी हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी**

**- संकलन व सुलेखन -**
**कृष्णकुमार निकोडे गुरूजी**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.**

# सुवर्ण चढाईत उपांत्य फेरीत धडक दिलेल्या महाराष्ट्राचा साई कडून पराभव

**अक्षराज : संदिप येवले**

**दि.११, मुंबई :** महाराष्ट्राच्या मुलींनी ५०व्या कुमार/कुमारी गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेच्या उपांत्य फेरीत धडक दिली. पण उपांत्य फेरीतच त्यांना पराभव पत्करावा लागला. भारतीय कबड्डी महासंघाच्या मान्यतेने उत्तर प्रदेश राज्य कबड्डी असो. ने या स्पर्धेचे आयोजन केले आहे. हरिद्वार येथील रोशनबाद बंदिस्त क्रीडा संकुलात झालेल्या उपांत्य फेरीत राज्यातील निवडक खेळाडूंचा भरणा असणाऱ्या साई(भारतीय क्रीडा प्राधिकरण)ने महाराष्ट्राचे आव्हान ४७-२२ असे संपविले. आक्रमक सुरुवात करीत पहिल्या डावात २८-०७ अशी आघाडी घेत साईन सामन्यावर नियंत्रण ठेवले. दुसऱ्या डावात देखील तोच जोश कायम राखत सामना महाराष्ट्राला डोकं वर काढू दिले नाही. दुसऱ्या डावात महाराष्ट्राच्या वैभवी जाधव, वैष्णवी काळे यांनी थोडा फार प्रतिकार केला. पण तो पर्यंत वेळ निघून गेली होती. या पराभवाने महाराष्ट्राचे उपांत्य फेरीतच स्वप्न भंगले.

या अगोदर झालेल्या उपउपांत्य फेरीच्या सामन्यात महाराष्ट्राच्या मुलींनी सुवर्ण चढाईत गोवा संघाचा प्रतिकार ४५-४३(२-०) असा मोडत धडाक्यात उपांत्य फेरी गाठली. क्षणा क्षणाला उत्कंठावेधक ठरलेल्या या सामन्यात अखेर महाराष्ट्राने बाजी मारली. अत्यंत चुरशीने खेळलेल्या या सामन्यात मध्यांतराला दोन्ही संघांची १९-१९ अशी बरोबरी होती. पूर्ण डावात गोव्याची शेवटची चढाई असताना ३८-३६ अशी महाराष्ट्राकडे आघाडी होती.



परंतु शेवटच्या चढाईत एक गुण गोव्याला देण्या ऐवजी त्यांनी दोन गुण टिपले आणि सामना ३८-३८ असा बरोबरीत सुटला. बाद फेरीचा सामना असल्याने कबड्डीच्या नियमाने ५-५ चढायांचा डाव खेळविण्यात आला. त्यात देखील पुन्हा ४३-४३(५-५) अशी बरोबरी झाली.

या बरोबरीची कोंडी सोडविण्याठी नियमाप्रमाणे सुवर्ण चढाई देण्यात आली. याकरिता पुन्हा नाणेफेक करण्यात आली. नाणेफेकीचा कौल महाराष्ट्राच्या बाजूने लागल्याने महाराष्ट्राने आर्धे काम फत्ते केले. शेवटच्या क्षणापर्यंत काळजाचा ठोका चुकविणाऱ्या या सामन्यात हि सुवर्ण चढाई महाराष्ट्राच्या रेखा राठोड हिने केली. तिने आपल्या त्या चढाईत गोव्याचे दोन गडी टिपत संघाला उपांत्य फेरी गाठून दिली. रेखाला वैभवी जाधवची मिळालेली अष्टपैलू खेळाची, तर वैष्णवी काळे, प्रतिक्षा लांडगे यांची चढाई पकडीची साथ यामुळे महाराष्ट्राने उपांत्य फेरी गाठली. याच सुवर्ण चढाईत रेखा राठोड हिने २ गडी टिपत महाराष्ट्राला उपांत्य फेरी गाठून दिली.

### संक्रांत सण..

मानवै: दव्यकव्यानि
संक्रांतौ यानि दत्तानि
तानि नित्यं ददात्यर्कः
लाभहोई पुनर्जन्मनि

पहिलासण सुखदाई
नववर्षात प्रारंभदिनी
संक्रांत अशुभ असते
अंध श्ध्दा नको मनी

पौष्टिकभाज्या अनेक
हुरडा बोरे ढाळा वनी
गोड गुलाबी थंड हवा
सुशोभित छानअवनी

हळदीकुंकूम समारोह
विधवा अन् सुवासनी
एकत्र येतात निमीत्ते
मुलगीमाता न् भगिनी

तिळ गुळ घ्यावे द्यावे
नाते जपावे आनंदानी
प्रारंभ नवीन पर्वाचा
वैर भाव तो विसरूनि

दानधर्म हे पुण्य कर्म
घडावे चांगले हातूनी
सकल भद्रणीपश्यंति
हुंकार उमळे आतुनि

पतंगोत्सव आनंदाचा
सकल धर्मिया घेऊनि
पर्यावरणा सांभाळावे
नियमा सन्मान देऊनि

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# हळदी-कुंकू समारंभातील धार्मिकता जोपासा !



हिंदू धर्मातील केवळ एक सण वगळता सर्व सण हे प्राचीन कालगणनेनुसार कोणत्या ना कोणत्या तिथीला येतात. सौर कालगणनेनुसार येणारा एकमेव हिंदू सण म्हणजे मकर संक्रांत. सूर्य या दिवशी मकर राशीत प्रवेश करतो म्हणून या दिवसाला मकर संक्रांत असे म्हटले जाते. दरवर्षी मकर संक्रांत १४ जानेवारीला साजरी करण्याचा प्रघात आहे. सुर्यभ्रमणामुळे पडणारे अंतर भरून काढण्यासाठी काही वेळा संक्रांत एक दिवस पुढे ढकलली जाते म्हणजे १५ जानेवारीला असते. यंदाची मकर संक्रात सुद्धा १५ जानेवारीला साजरी केली जाणार आहे. एकमेकांमधील हेवेदावे विसरून तिळगुळ खाऊन गोड बोलण्याचा संदेश देणारा हा सण लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांच्याच आवडीचा सण आहे. संक्रांतीला हिंदू धर्मात देवता मानले जाते. या देवतेने संकरासुर नावाच्या दैत्याला ठार मारले तो दिवस संक्रांत आणि दुसऱ्या दिवशी किंकरासुराला ठार केले तो दिवस किंक्रांत म्हणून ओळखला जातो. या दिवसापासून सूर्याचे उत्तरायण सुरु होते. उत्तरायणात मृत्यू येणे अधिक चांगले समजले जाते. शरशय्येवर ५८ दिवस पडून असलेल्या पितामह भ्रिष्मांनी सुद्धा उत्तरायण सुरु झाल्यानंतर देहत्याग केला.

संक्रातीच्या दिवसापासून पुढे रथ सप्तमीपर्यंत घरोघरी हळदी कुंकू घालण्याचा प्रघात आहे. एरव्ही एकमेकांची उणीधुणी काढण्याची एकही संधी न सोडणाऱ्या स्त्रिया शेजार पाजरच्या सुवासिनींना घरी बोलावून त्यांना हळद कुंकू कावतात आणि वाण म्हणून एखादी वस्तू देतात. सुवासिनीच्या रूपात साक्षात देवीचे घरी आगमन झाले आहे या भावाने आलेल्या सुवासिनीला हळद कुंकू लावून तिचे पूजन केले जाते. फुल,गजरा किंवा वेणी देऊन तिला नमस्कार केला जातो. तिला वाण दिले जाते. वाण देणे हे त्यागाचे प्रतीक आहे. घरी आलेल्या दुर्गारूपी सुवासिनीच्या पूजनानंतर तिला तन मन धन समर्पित करत आहोत या भावाने प्रतीकात्मक वस्तू म्हणून वाण दिले जाते. गेल्या काही वर्षांपासून हळदी कुंकूंचे कार्यक्रम सार्वजनिक रीत्याही साजरे केले जाऊ लागले आहेत. हौसिंग सोसायट्या, सार्वजनिक उत्सव मंडळे, महिला बचत गट, मंदिर समित्या, राजकीय पक्ष, संघटना यांच्यावतीने प्रतिवर्षी हळदी कुंकूंचे कार्यक्रम आयोजित केले जातात. यानिमित्ताने काहीनाकाही वस्तू वाण म्हणून दिली जाते.

बजेट ठरवून वाण म्हणून दिल्या जाणाऱ्या वस्तूंमध्ये बऱ्याचदा फण्या, प्लास्टिकचे डबे, प्लॅस्टिकच्या डिशेश, स्टीलच्या वाट्या, चमचे, साबण, साबणघर यांसारख्या असात्त्विक वस्तू दिल्या जातात. सुवासिनीला हळद कुंकू लावताना आदिशक्ती म्हणून तिचे पूजन केले जाते अशा आदिशक्तीला असात्त्विक वस्तू वाण म्हणून देणे अयोग्य आहे. हळदी कुंकू हा धार्मिक कार्यक्रम असल्याने वाण म्हणून दिल्या जाणाऱ्या वस्तूही सात्विक असायला हव्यात. उदबत्या, उटणे, कापूर, वाती, पोथी, देवतांच्या कथा आदी सात्विक वस्तू भेट म्हणून द्याव्यात.

गेल्या काही वर्षांपासून हळदी कुंकू सारख्या धार्मिक समारंभाचाही इव्हेन्ट केला जाऊ लागला आहे. राजकीय पुढाऱ्यांकडून आलिशान सभागृह किंवा मोठे मैदान बुक करून महिलांसाठी हळदी कुंकूंचे कार्यक्रम आयोजित केले जाऊ लागले आहेत. महिलांना आकर्षित करण्यासाठी या कार्यक्रमांना चित्रपटांतील आणि मालिकांतील अभिनेत्रींना सेलिब्रिटी गेस्ट म्हणून बोलावले जाते, महिलांच्या मनोरंजनासाठी 'होम मिनिस्टर' किंवा अन्य विविध प्रकारच्या स्पर्धा आयोजित केल्या जातात, नृत्यासाठी वाद्यवृंदाची व्यवस्था करण्यात येते. काही ठिकाणी तर आलेल्या महिलांच्या जेवणाचीही सोय आयोजकांनी केलेली असते. अशा समारंभांना प्रमुख पाहुणे म्हणून येणारी राजकीय मंडळी महिलांची गर्दी पाहून लांबलचक भाषणे द्यायला सुरुवात करतात. नवरात्री, दहीहंडी प्रमाणे आता हळदी-कुंकूसारख्या धार्मिक समारंभाचा इव्हेन्ट होत असलेला पाहून मनाला वेदना होतात.

**सौ. मोक्षदा घाणेकर,**
**काळाचौकी, मुंबई**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# पारनेर तालुक्यातल्या ४ उपसा जलसिंचन योजनांना मान्यता द्या

## मंत्री विखेंकडे भूमिपुत्रांची मागणी

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१३, पारनेर (अहिल्यानगर) :** कान्हूर पठार, पुणेवाडी, राळेगणसिद्धी, जातेगाव उपसासिंचन योजनांना मान्यता देऊन कार्यान्वित करण्यात यावे व गोदावरी खोऱ्यात बंधारे बांधण्यासाठी असलेली बंदी उठवून तांबडी कार धरण बांधण्यात यावे या मागण्यांचे निवेदन भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक संतोष वाडेकर यांनी राज्याचे जलसंपदामंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे) ना.राधाकृष्ण विखे पाटील यांना दिले आहे.



यावेळी बाळासाहेब पाटील झावरे, मोहन रोकडे, भास्कर गागरे, सिताराम देठे, संतोष वाबळे, रघुनाथ मांडगे, अरूण बेलकर, अब्बास मुजावर, सखाराम ठुबे, सुभाष ठुबे, सुभाष भागवत, राजेंद्र रोकडे, बाळशिराम पायमोडे, अशोक अंधाळे, सुभाष करंजुले, दादाभाऊ सोनवळे, बाळासाहेब वाळुंज, प्रविण खोडदे, अनिल सोबले, चिंतामणी सोनावळे, सुयश वाळुंज, यांच्यासह खडकवाडी, पळशी येथील शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, पिंपळगाव खांड धरणाच्या लाभक्षेत्रात एकूण १४ बंधारे आहे. यामध्ये १० बंधाऱ्यांचाच या धरणाच्या लाभक्षेत्रात समावेश आहे. दरवर्षी या धरणाचे रोटेशन फक्त आभाळवाडीपर्यंतच सोडले जाते. मात्र जांबुत, टेकडवाडी, साकूर, मांडवे या चार बंधाऱ्यांचा लाभक्षेत्रात समावेश नसल्याने ते भरून मिळत नाही.

त्यामुळे ऐन उन्हाळ्यात मोठ्या प्रमाणात शेती व पिण्याच्या पाण्याचे जलसंकट उभे राहते. त्याचबरोबर ग्रामपंचायतींच्या पाणी पुरवठा योजना देखील बंद पडल्या जातात.

त्यामुळे पठार भागातील मुळानदी काठची गावे पाण्यापासून वंचित राहतात. त्यामुळे या चार बंधाऱ्याचा लाभक्षेत्रात समावेश करून हा प्रश्न कायमचा मार्गी लावावा.

तसेच कान्हुरपठार, पुणेवाडी, राळेगणसिद्धी, जातेगाव उपसा सिंचन योजनांना मान्यता देऊन कार्यान्वित करण्यात यावे व गोदावरी खोऱ्यात बंधारे बांधण्यासाठी असलेली बंदी उठवून तांबडीकार धरण बांधण्यात यावे. असे भूमिपुत्र शेतकरी संघटनेने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

# थोडक्यात

## खा.प्रा. चव्हाण यांच्या हस्ते सुष्मिता जाधव गौरवान्वित



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१३, नांदेड :** मध्य प्रदेशातील सतना येथे झालेल्या वेस्ट झोन इंटर युनिव्हर्सिटी टेबल टेनिस २०२४-२५ स्पर्धेत महाराष्ट्राचे नेतृत्व करतांना स्वामी विवेकानंद नगर नांदेड येथील कु.सुष्मिता गणेश जाधव हिने रौप्य पदक पटकावले. या विजयामुळे तिची दिल्ली येथील राष्ट्रीय स्पर्धे साठी निवड झाली आहे. या यशाबद्दल नांदेड जिल्ह्याचे लोकप्रिय खा.प्रा.रवींद्र वसंतराव चव्हाण यांनी सत्कार करून पुढील वाटचालीसाठी जाधव कुटुंबीयांना शुभेच्छा दिल्या. यावेळी युवक काँग्रेस तालुकाध्यक्ष गणेश कोकाटे सांगवीकर, विद्यार्थी काँग्रेसचे गोविंद पाटील, प्रथमेश गिरी, संदीप जाधव व जाधव कुटुंब उपस्थित होते.

## डोंबिवली पश्चिम येथील ५२ चाळ परिसरामध्ये आगीचे तांडव

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.१२, डोंबिवली (ठाणे) :** डोंबिवली पश्चिम येथे दिनांक १२ जानेवारी २०२५ रोजी रात्री १०:१५ च्या सुमारास विष्णुनगर हद्दीमध्ये बावन चाळ डोंबिवली रेल्वे लगत लागून असलेले रेल्वे मैदान परिसरामध्ये कोणीतरी अनोळखी व्यक्तीने झाडाला व इतर ठिकाणी आग लावल्याने खळबळ उडाली.प्रसंगी ठाकरे गटाचे युवासेना पदाधिकारी ऋतूनिल पावसकर यांनी तात्काळ महानगरपालिकेचे अग्निशमन दलाला संपर्क साधला व त्यांनी तत्काळ त्या ठिकाणी धाव घेतली. अग्निशमन दलाकडून आग विझवण्यात आली असून अग्निशमन दलाचे अधिकारी सुशील देशपांडे राजेश कसावे, चालक प्रकाश फुंडे, फायरमॅन किशोर बच्छाव, दर्पण चिखले, योगेश डगले, संकेत शिर्के महेश थोपटे यांनी ही आग विझवल्यामुळे मोठी होणारी दुर्घटना टळली. घटनास्थळी उपस्थित लोकप्रतिनिधींनी व लोकांनी अग्निशमन टीमचे आभार व्यक्त केले. यावेळी शिवसेना महिला पदाधिकारी प्रियंका विचारे या ही उपस्थित होत्या.

## डोंबिवली वाहतूक शाखेकडून वाहन चालक-मालक, नागरिकांसाठी आरोग्य शिबिर संपन्न



**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.१३, डोंबिवली (ठाणे) :** ठाणे पोलीस आयुक्तालय ठाणे शहर अंतर्गत डोंबिवली वाहतूक उपशाखा च्या वतीने ३५ वे रस्ता सुरक्षा अभियान २०२५ या अभियान अंतर्गत डोंबिवली वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीराम पाटील यांनी एलपीझो मल्टी स्पेशलिस्ट हॉस्पिटल आणि मेडिकल रिसर्च सेंटर यांचं वतीने मोफत आरोग्य शिबिर वाहन चालक-मालक आणि नागरिकांसाठी डोंबिवली पूर्व शुभम हॉल या ठिकाणी आयोजन करण्यात आले या कार्यक्रमांमध्ये सहाय्यक पोलीस आयुक्त विजय पवार, पंकज जैन अल्पिझो हौस्पिटल ओनर, पद्मश्री डॉक्टर माने, सेफ्टी वेल्फ अर असोसिएशनचे अध्यक्ष विशाल वि.शेटे यांनी प्रमुख उपस्थिती दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. या शिबिरामध्ये वाहतूक शाखेचे सर्व अधिकारी अंमलदार आणि वाहन चालक मालक यांचे मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली असून या कार्यक्रमाला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

## महाटी येथे राजमाता जिजाऊ यांची ४२८ वी जयंती साजरी



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१३, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड तालुक्यातील महाटी येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दिनांक १२ जानेवारी २०२५ रोजी महाराष्ट्राची शान छत्रपती शिवाजी महाराजांच्या मातोश्री राजमाता जिजाऊ यांची ४२८ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. महाराष्ट्राच्या इतिहासात राजमाता जिजाऊंचे नाव अविस्मरणीय आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मातृशक्ती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जिजाऊंनी शिवाजी महाराजांना एक महान शासक बनवण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला माँ राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार सविता गोविंद ढगे यांच्या हस्ते अर्पण करण्यात आले. भगव्या ध्वजाचा ध्वजारोहण करण्यात आले सामुदायिक जिजाऊ वंदना ही घेण्यात आली.यावेळी व्यंकटराव ढगे, सरपंच बळी ढगे, आनंदराव ढगे, सुर्यकांत ढगे, बळवंत ढगे, गणेश ढगे,हानमंत ढगे,पुरभा ढगे,बाबुस ढगे, मारोती ढगे, भास्कर ढगे, गुलाब ढगे, शिवाजी ढगे, तुकाराम ढगे, गोविंद ढगे, उत्तम ढगे, बालाजी ढगे यांसह आदींची उपस्थिती होती.

## १७ वर्षा नंतर भरली पानगावमध्ये जत्रा

**अक्षराज : उमेश जोशी**

**दि.१३, (लातूर) :** पानगाव रेणापूर तालुक्यातील पानगाव येथील हिन्दू -मुस्लिम चेश्रद्धास्थान असलेले पानगाव येथील हजरत मंलगशाहवली बाबा दर्गा असलेले जागुरूत देवस्थान म्हणजे हजरत मंलगशाहवली बाबा दर्गा होय ५०० वर्षा पूर्वी गावोगावी समाज प्रबोधन करत करत मंलग शाहवली बाब व इतर पाच जन औरंगाबाद येथे पोहचले व तेथून समाज प्रमोधन करीत करीत पानगाव या ठिकाणी मुक्कमी पोहचले आणि येथे मंलगशाहवली बाबा नी जिवंत समाधी घेतली. यांच्यासोबत आलेले पाच शाकीर (सेवेकरी) सुद्धा पानगाव या ठिकाणी आले बाबा ची सेवा करता करता वोयोवृद्ध होऊन मृत्यू पावले. या पाच जनाच्या (मदार) समाधी याच दर्गा परिसरात आजही पाहायला मिळतात. येथील जत्रला दि.१३ जानेवारी पासून सुरवात झाली असून दि.१३ जानेवारी २०२५ रोजी देवाची संपूर्ण गावात हिन्दू-मुस्लिम बांधवाच्या उपस्थितीत संदल मिरणूक काढली गेली. दुसऱ्या दिवशी १४ जानेवारी रोजी कव्वालीचा जंगी मुकाबल्याचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये नांदेड येथील अरमार इम्रेकारी आणि बेंगलोर येथील सुप्रासिद्ध कव्वाल असलेले तेहेसीन ताज या दोघांचा जंगी कव्वाली मुकाबला होणार आहे. तब्ब्ल १७ वर्षांपासून बंद असलेली यात्रा सुरु झाल्यामुळे गावामध्ये आनंदाचे वातावरण आहे. गेल्या अनेक दिवसा पासून बंद पडलेली यात्रा सर्व गावकऱ्याच्या पुढाकारातून पुन्हा सुरु झाली आहे.

# पारनेर तालुक्यातील ५२ ग्रामपंचायतीतून शासकीय रक्कमेचा अपहार

## अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीचा आंदोलनाचा इशारा

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१३, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील पारनेर पंचायत समिती अंतर्गत असणाऱ्या ५२ ग्रामपंचायतच्या निधीतून शासकीय कपातीच्या रक्कमेचा अपहार झालेला असताना ग्राम पंचायत निहाय दप्तर तपासणी करुन फेर लेखापरीक्षण विभागीय आयुक्त नाशिक यांच्या स्तरावरुन करण्याची मागणी अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने करण्यात आली आहे.

सदर प्रश्नी कारवाई न झाल्यास प्रजासत्ताक दिनी दिनांक २६ जानेवारी २०२५ रोजी जिल्हा परिषद सम ोर आंदोलन करण्याचा इशारा समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी दिला आहे. पारनेर तालुक्यातील पारनेर पंचायत समिती अंतर्गत असणाऱ्या ग्राम पंचायतीचे ग्रामविकास अधिकारी यांनी ग्रामपंचायत निहाय कामाची यादी, ती कामे पूर्ण झाल्याबाबत व त्या कामाच्या शासकीय कपातीच्या रकमेचे चलन पावत्या याची माहिती देण्यास जाणीवपूर्वक दिरंगाई करण्यात आलेली आहे. पंचायत समितीचे ग्रामविकास अधिकारी यांनी कर्मचारी यांच्याशी संगनमत करून शासकीय कपातीची काही ग्रामपंचायतीची रक्कम हडप केली असल्याचा आरोप संघटनेच्या वतीने करण्यात आला आहे. ग्रामविकास अधिकारी यांच्यावर निलंबनाची कारवाई करून, त्यांच्यावर फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात यावा, विभागीय आयुक्त नाशिक यांच्या स्तरावरून पारनेर पंचायत समिती अंतर्गत २०२१ ते आज आखेर पर्यंतचे मंजूर कामे, पूर्ण झालेल्या कामाच्या शासकीय कपातीच्या रक्कमेची दप्तर तपासणी करुन करुन फेर लेखापरीक्षण विभागीय आयुक्त नाशिक यांच्या स्तरावरुन करावे, त्यातील दोषी ग्रामविकास अधिकारी, इतर अधिकारी व कर्मचारी यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# डॉ.सोपानराव चव्हाणांनी शिक्षणाच्या माध्यमातून अनेक पिढ्यांचा उद्धार केला - डॉ.साळूंखे

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.१३, पाटण (सातारा) :** कोयना एज्युकेशन सोसायटीमुळे अतिदुर्गम,डोंगरदऱ्यात विखुरलेल्या तालुक्यात जिथे शिक्षण नाही तेथील तळागाळातील सर्वसामान्य बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचविण्याचे पोहचविण्याचे कार्य झाले. पिढीजात ज्यांच्या कपाळी निरक्षरतेचे कलंक होता त्यांच्या कपाळी प्रगतीचा टिळा लावण्याचे पवित्र कार्य करणाऱ्या डॉ. सोपानराव चव्हाण यांनी शिक्षणाच्या माध्यमातून अनेक पिढ्यांचा उद्धार करण्याचे अलौकिक कार्य केले असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगरू डॉ. माणिकराव साळूंखे यांनी केले.

येथील कोयना एज्युकेशन सोसायटी व महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा पाटण यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या डॉ. सोपानराव चव्हाण यांचा ९० वा वाढदिवस अभिष्टचिंतन व प्रा.डी.डी.चव्हाण यांनी लिहिलेल्या 'ज्ञानतपस्वी डॉ. सोपानराव चव्हाण ' चरित्रग्रंथाचे प्रकाशन सोहळा अशा संयुक्त कार्यक्रमात ते बोलत होते.यावेळी माजी सार्वजनिक बांधकाम व पर्यटनमंत्री विक्रमसिंह पाटणक, कोयना एज्युकेशन सोसायाटीचेजनरल सेक्रेटरी अमरसिहं पाटणकर, संस्थेचे संचालक डॉ. प्रल्हाद चव्हाण, याज्ञसेन पाटणकर, संजीव चव्हाण, पृथ्वीराज पाटील, दादासो जाधव, कवयित्री सौ.मीरा चव्हाण, डी.डी.चव्हाण तसेच चव्हाण कुटूंबीय तालुक्यातील विविध संस्थाचे पदाधिकारी, शिक्षणप्रेमी नागरिक, शिक्षक, प्राध्यापक उपस्थित होते.



यावेळी डॉ. माणिकराव सांळूखे म्हणाले की, माणूस उच्च शिक्षित झाला की तो आपल्या गावाला विसरतो पण डॉ.सोपानराव चव्हाण यांनी उच्च शिक्षण घेवूनही आपल्या गावाला न विसरता त्यांनी गावाकडील सर्वसामान्य माणसाशी संपर्क ठेवला.शिस्त, संयम आणि सातत्याने काम करण्याची वृत्ती, आचरणातील शालिनता, बोलण्या, वागण्यातील नम्रता या गुणांनी शिक्षण व्यवस्थेत परिवर्तनवादी कार्य करणाऱ्या डॉ. सोपानराव चव्हाण यांचे कार्य अलौकिक असल्याचे सांगितले.

माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर म्हणाले की, डॉ.सोपानराव चव्हाण यांनी मिळालेल्या प्रत्येक संधीचे सोने केले. संस्थेचे काम करताना शहरात मिळणारे शिक्षण माझ्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना तालुक्यात कसे मिळेल याकडे त्यांनी विशेष लक्ष दिले. त्याग आणि संघर्षाशिवाय मोठेपण मिळत नाही. कोयना एज्युकेशन सोसायटीच्या प्रगतीसाठी काकांनी घेतलेले कष्ट, केलेला संघर्ष आणि त्याग महत्त्वाचा असून माणसाजवळ विधायक कामाची दृष्टी असेल तर स्व प्रयत्नांती तो समाज परिवर्तन घडवून विकासाची दृष्टी निर्माण करू शकतो ते काम डॉ. सोपानराव चव्हाण यांनी केले असल्याचे सांगितले. यावेळी सत्काराला उत्तर देताना डॉ. सोपानराव चव्हाण म्हणाले की, आनंद मागून मिळत नाही तो मिळवावा लागतो. काम करताना आपल्या जवळ येणाऱ्या सर्वांना मदत करा. कामात आनंद असतो तो मिळवा. पेन्सील हातात धरताना लटपटणारे हात जेव्हा हुबेहुब शिक्षकांच्या अक्षरांची नक्कल करतात ते आपले प्रशस्तीपत्रक असते.कोयना एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून झालेले शैक्षणिक कार्य आणि संस्थेच्या प्रगतीमध्ये माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर यांचे मोलाचे मार्गदर्शन आणि योगदान असल्याचे सांगून संस्थेच्या वाटचालीतील अनेक घटनांचा तसेच प्रसंगाना उजाळा दिला.यावेळी संस्थेचे जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर यांनी काकांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेने केलेल्या प्रगतीचा आढावा घेताना काकांच्या कार्याचा गौरव करून या वयातही तरुणांना लाजवेल अशा उत्साही काकांचे कार्य प्रेरणादायी असल्याचे सांगितले. चरित्रग्रंथाचे लेखक डी.डी. चव्हाण यांनी मनोगत व्यक्त केले.संजय इंगवले यांनी प्रास्ताविक केले.सुत्रसंचालन प्रा.डॉ. विनायक राऊत व दिनकर माथणे यांनी केले. संस्थेचे संचालक संजीव चव्हाण यांनी आभार मानले.

## कोकणातून जास्तीत जास्त विद्यार्थी प्रशासकीय सेवेत असणारच-सत्यवान रेडकर



**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.१३, (सिंधुदुर्ग) :** सिंधुदुर्ग जिल्ह्याचे भूमिपुत्र, महाराष्ट्रातील प्रख्यात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक सत्यवान यशवंत रेडकर (कनिष्ठ अनुवाद अधिकारी, मुंबई सीमाशुल्क, भारत सरकार) यांनी वैभववाडी तालुक्यात आनंदीबाई रावराणे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वैभववाडी व आचिर्णे कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, आचिर्णे येथे ३०९-३१० वे नि:शुल्क शासकीय स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व्याख्यान दिले. या कार्यक्रमासाठी विजय रावराणे,प्रभानंद राणे, शरद रावराणे यांनी पुढाकार घेतला होता. दोन्ही शैक्षणिक संकुलातील प्राचार्य, सहायक प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कोकणातून जास्तीत जास्त अधिकारी घडावेत, शासकीय कर्मचाऱ्यांचे गाव ही संकल्पना सत्यात उतरवण्यासाठी सत्यवान रेडकर नेहमी प्रयत्नशील असतात. या व्याख्यानात विद्यार्थ्यांनी मनमुराद आनंद लुटला व स्पर्धा परीक्षेचे धडे प्राप्त केले, विद्यार्थ्यांनी आपले मनोगत सुद्धा व्यक्त केले.

## राजे प्रतिष्ठान न्यु इंग्लिश स्कुलचे स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**अक्षराज : शरद भगत**

**दि.१३, मोरगाव (बारामती) :** राजे प्रतिष्ठान न्यु इग्लिश स्कुल खंडुखैरेवाडीचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न झाले. या स्नेहसंमेलनात भारत देशातील विविध राज्यातील संस्कृती गाण्यांच्या माध्यमातून दाखवण्यात आली. महाराष्ट्राचे नायक दादा कोंडके, लक्ष्मीकांत बेर्डे, गायिका लता मंगेशकर यांच्या गाण्यातून वंदन करण्यात आले.

राजे प्रतिष्ठान न्यु इंग्लिश स्कुल खंडुखैरेवाडी मधिल वर्गात प्रथम तीन नंबर येणार्या तसेच दहावीत येणार्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला .तसेच स्कुल गृप हाऊसचा ही ट्रॉफी देऊन सत्कार केला. राजे प्रतिष्ठान संचलित मयुरेश्वर औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या वतीने क्रिकेट, व्हॉलीबॉल, कबड्डी अशा विविध स्पर्धांमधील विजेत्या संघाला ट्रॉफी देऊन सन्मानित केले.

वार्षिक स्नेहसंमेलनात ज्युनिअर केजी ते नववी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता .तर दहावीच्या विद्यार्थ्यानीं सुत्रसंचलन केले. या कार्यक्रमासाठी राजे प्रतिष्ठान चे संस्थापक अध्यक्ष दिलीप आप्पा खैरे, सचिव मनिषा खैरे, बारामती दुध संघाचे माजी संचालक सुरेश वाबळे, निलेश खैरे, विशाल खैरे अक्षय खैरे, चांदगुडे वाडीचे सरपंच अशोक खैरे, स्वाती ढवळे स्कुल च्या मुख्याध्यापिका वनिता कस्तुरे आदि मान्यवर उपस्थित होते.

# सानपाडा येथे बीएमसी वॉरीयर्स च्या वतीने 'शिक्षक चषक २०२५' उत्साहात संपन्न

**अक्षराज : विनोद धुरंधर**

**दि.१२, सानपाडा (नवी मुंबई) :** नवी मुंबईतील सानपाडा से. ९ येथील झाशीची राणी क्रीडांगणात रविवार, दि.१२ जानेवारी २०२५ रोजी बीएमसी वॉरियर्स आयोजित क्रिकेटचा 'शिक्षक चषक २०२५, पर्व ४ थे मोठ्या उत्साहात खेळण्यात आले. या स्पर्धेत बृहन्मुंबई, नवी मुंबई, ठाणे व पनवेल महानगरपालिकेच्या शालेय शिक्षकांच्या एकूण १६ संघांनी सहभाग नोंदविला होता. या कार्यक्रमाचे आयोजन बेलापूर विधानसभेच्या आमदार मंदा म्हात्रे यांचे खंदे समर्थक नवी मुंबई भाजपा उपजिल्हाप्रमुख जगन्नाथ (आबासाहेब) जगताप तसेच समर्थ कामगार संघटना उपाध्यक्ष राजेंद्र पवार यांच्या नेतृत्वात करण्यात आले. या कार्यक्रमास निसर्ग फाउंडेशन चे सुनील नाईक, भाजपा जिल्हा सरचिटणीस अजित सोनवणे, दिलीप पाटील, राजेश गायकवाड आदींसह प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. दरम्यान उपस्थितांसाठी पाणी, भोजन व अल्पोपहाराची सोय करण्यात आली होती.

याप्रसंगी बृहन्मुंबई मनपाच्या एफ. एम. सी. सी. विजेत्या संघास 'शिक्षक चषक २०२५' चा प्रथम पारितोषिक चषक देताच फटाक्यांची आतिशबाजी करत खेळाडूंकडून जल्लोष करण्यात आला. संजय इलेव्हन या उपविजेत्या संघास द्वितीय पारितोषिक चषक देण्यात आले. तिसरे पारितोषिक दुनियादारी इलेव्हन व मोरया इलेव्हन यांना संयुक्त चषक देण्यात आले. तसेच 'मॅन ऑफ द सिरीज चे पारितोषिक शरनू, मॅन ऑफ द मॅच' चे पारितोषिक फाहाद, उत्कृष्ट फलंदाज नासीर, उत्कृष्ट गोलंदाज



मोहम्मद मुस्तकीम याचबरोबर उत्कृष्ट क्षेत्ररक्षण चे पारितोषिक ईशान यांना देण्यात आले. त्याचबरोबर समालोचक यमकर, अमोल, पानसरे यांना देऊन सन्मानित करण्यात आले. दरम्यान बृहन्मुंबई मनपा प्रशासकीय अधिकारी किसन पावडे, विजय जाधव, उपशिक्षण अधिकारी किर्तीवर्धन किरत कुडवे, मुख्याध्यापिका प्रियंका कदम, मोनिका शर्मा या प्रमुख पाहुण्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नाना, बबन,संतोष, रवी,भवन बिसेन, कुंदन, महेश, रामचंद्र कचरे, साजन, विठ्ठल आदींनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी निवेदक प्रवीण पानसरे यांनी उपस्थितांचे व सर्व खेळाडूंचे आभार व्यक्त केले.

# जानकाई विद्यालयात दोन दिवसीय वार्षिक स्नेहसंमेलन दिमाखात संपन्न

**अक्षराज : दिपक शिवले**

**दि.१२, कळवण (नाशिक)** : जानकीबाई एज्युकेशन सोसायटी संचलित जानकाई प्राथमिक व माध्यमिक विद्यालय कळवण विद्यालयात दि. १० व ११ जानेवारी रोजी दोन दिवस वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. स्नेहसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक चंद्रकांत जगन्नाथ कोठावदे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून कौतीक पगार नगराध्यक्ष नगर पंचायत कळवण, उद्योजक बेबीलाल संचेती अध्यक्ष एस.एन.जे.बी चांदवड, गटशिक्षणाधिकारी पी.पी.महाले, शिक्षण विस्तार अधिकारी कोठावदे उपस्थित होते.




यावेळी पहिल्या दिवशी मानवराच्या उपस्थितीत प्रतिमा पुजन व दिपप्रज्वलन करून उद्घाटन करण्यात आले. पहिल्या दिवसाच्या स्नेहसंमेलनाची सुरुवात राजदरबाराचे दृश्य दाखवून करण्यात आले. व दुसऱ्या दिवशी कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून तहसीलदार वारुळे, ए.पी.आय.बोरसे कळवण पोलिस स्टेशन, प्रवीण संचेती व्यावसायिक कळवण रिटायर्ड आर्मी कैलास खैरनार, संस्थेच्या मार्गदर्शिका उषाताई कोठावदे, प्राचार्या टी.एन.रौदळ कॉलेज सुचिता रौंदळ,

इनरव्हील क्लब अध्यक्ष वैशाली कोठावदे, सेक्रेटरी रोहिणी विसपुते, सटाणा मर्चंट बँकेच्या चेअरमण कल्पना येवला, संध्याताई कोठावदे, शालीनीताई महाजन, जिल्हाउपाध्यक्ष नाशिक ग्रा (भा.ज.पा) एस.के.पगार, सुनिल दादा कोठावदे, संजय मालपुरे, जितेंद्र विसपुते, धिरेण पगार, दिपक अमृतकार व सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर व मुख्याध्यापक (माध्यमिक) एम.बी.जोशी, मुख्याध्यापक (प्राथमिक)एच.व्ही.दशपुते उपस्थितीत होते.

प्रमुख पाहुणे मनोगतातून विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच आई-वडील शिक्षकांचा ही आदर सन्मान करावा व आध्यात्मिकतेकडे वाटचाल करावी असे प्रतिपादन तहसीलदार वारुळे साहेब यांनी केले.

वार्षिक स्नेहसंमेलनात दोन्ही विभागातील विद्यार्थ्यांनी भावसाक्षरता, राष्ट्रीय जबाबदारी, ध्येय निश्चित, आजी-आजोबा वृद्धाश्रम नाटीका, आई-वडील-गुरू रूनानुबंध जोपासणारी थीम, सामाजिक जाण, प्रदुषण मुक्तता, देशप्रेम, आध्यात्मिकतेची जाणीव करून देणारे नृत्य, महाराष्ट्राची लावणी, रामायण, महाभारत, महाराष्ट्रीयन लोककला प्रकार यांबरोबरच मनोरंजक असे कार्यक्रम घेण्यात आले. वार्षिक स्नेहसंमेलनाचे प्रमुख आकर्षण म्हणून स्वराज्याचे धाकले धनी स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांचा जन्म उत्सव व राज्याभिषेक सोहळा दाखवण्यात आला.

या थीममध्ये छत्रपती संभाजी महाराज यांची मुख्य भूमिका विद्यालयातील मराठी विषय शिक्षक आर.आर.सोनवणे यांनी साकारली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी विषय शिक्षक आर.एस.अमृतकार व एस.एच.भामरे यांनी केले तर विद्यालयाचे मुख्याध्यापक एम.बी. जोशी यांनी वार्षिक अहवाल मांडला व प्रास्ताविक एच.के.सोनवणे यांनी केले.

तसेच कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विद्यालयाचे पुर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक विभागातील सर्व शिक्षक शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी व पालक वर्ग यांनी सहकार्य केले.

# समाजामध्ये जे घडतंय जे सत्य आहे तेच मांडण्याचे काम पत्रकार करतात - एस.के.चव्हाण

## छत्रपती नागरी पतसंस्थेच्या वतीने पंढरपूर येथे ग्रामीण पत्रकारांचा सन्मान

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१३, पंढरपूर :** ज्या पत्रकारांमुळे आपण राजकारण समाजकारण करतो त्याच पत्रकारांकडे खरंतर दुर्लक्ष करण्याचे काम सध्या होत असून लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून पत्रकारांना मानले जाते. कारण समाजातील होत असणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी तसेच चांगले वाईट हे समाजासमोर आणण्यासाठी पत्रकार खूप महत्त्वाचे आहेत माझ्या सामाजिक क्षेत्रातील तसेच शैक्षणिक क्षेत्रातील आजपर्यंत सर्व बातम्या पत्रकारांनी लावल्या असून समाजामध्ये जे घडतंय जे सत्य आहे तेच मांडण्याचे काम पत्रकार करतात त्यामुळे त्यांचा सन्मान करणे ही आमची जबाबदारी असल्याचे प्रतिपादन छत्रपती सहकारी पतसंस्थेचे चेअरमन एस.के. चव्हाण यांनी केले.

जिजाऊ साहेब जयंती, स्वामी विवेकानंद जयंती तसेच पत्रकार दिनाचे औचित्य साधत छत्रपती नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन तथा एस के चव्हाण मित्र मंडळ पंढरपूर यांच्या वतीने एस के चव्हाण यांच्या निवासस्थानी पत्रकारांचा सत्कार समारंभ संपन्न झाला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी दैनिक नवमित्रचे चंद्रकांत माने, दैनिक जनमत विकास



सरवळे, दैनिक पंढरी भूषण सावता जाधव, दैनिक माणदेश नगरी नेताजी शिंदे, दैनिक पुण्यनगरी नेताजी वाघमारे, दैनिक तरुण भारत संवाद संतोष रनदिवे, परिवर्तन न्यूज व दैनिक सकाळ बालाजी फुगारे तसेच दैनिक लोकमतचे अंबादास वायदंडे या पत्रकारांचा सन्मान करण्यात आला तर यावेळी अॅड.किरणराज घोडके यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले व अक्षय कदम, योगेश सुरवसे, गणराज ढोबळे यांनी हा कार्यक्रम पार पाडण्यासाठी परिश्रम घेतले.

# वायू प्रदूषण कमी करण्यासाठी सखोल स्वच्छता मोहिमांचा होतोय उपयोग

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१२, नवी मुंबई :** महानगरपालिका क्षेत्रात स्वच्छतामित्र व स्वच्छतासखीच्या माध्यमातून नियमित स्वच्छता केली जात असते. तथापि नमुंमपा हद्दीतील सायन पनवेल महामार्ग, ठाणे बेलापूर मार्ग, आम्र मार्ग तसेच शहराच्या अंतर्गत भागातील मुख्य रस्ते यावर नेहमीच वाहनांची वर्दळ असल्याने व त्यातही बांधकाम साहित्य अथवा घनमाती, पाडकाम साहित्य वाहून नेणाऱ्या मोठ्या वाहनांची संख्याही जास्त प्रमाणात असल्याने त्यांच्या कडेला माती साचून राहिल्याचे निदर्शनास येते. ही साचलेली माती वाहनांच्या वेगामुळे उडून हवेतील धुळीचे प्रमाण वाढते. ही बाब लक्षात घेत महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या नियंत्रणाखाली विशेष सखोल स्वच्छता मोहीम अर्थात (डीप क्लीनिंग ड्राईव्ह) चे ३० डिसेंबरपासून आयोजन करण्यास सुरूवात झाली. अगदी रविवारी सार्वजनिक



सुट्टीच्या दिवशीही सकाळच्या सत्रात ही मोहीम प्रभावीपणे राबविण्यावर भर देण्यात आला.

महामार्गांप्रमाणेच दुर्लक्षित पडीक जागांवर ही ही मोहीम प्राधान्याने राबविण्यात आली. त्याकरिता अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली प्रत्येक दिवशी प्रत्येक विभागात कोणत्या भागाची साफसफाई करायची ते निश्चित करण्यात आले. यामध्ये रस्त्यांच्या व पदपथांच्या कडेला साचून घट्ट झालेली माती उचलण्याचे निश्चित करण्यात आले. त्यासोबतच अत्याधुनिक फॉगर्स मशीनद्वारे पाणी मारुन रस्त्यांची सफाई देखील केली जात आहे. याकरिता महानगरपालिकेच्या मलप्रक्रिया केंद्रातील शुद्ध केलेल्या प्रक्रियाकृत पाण्याचा वापर करण्यात येत आहे.या मोहीमेच्या वेळापत्रकानुसार रविवारी, १२ जानेवारी २०२५ रोजी कोपरखैरणेत घणसोली नाला ते धारण तलाव रस्ता, घणसोली विभागात सेक्टर ११ साईबाबा सर्कल ते भागवत रोड मुख्य रस्ता ते आगरी चौक, दिघा विभागात व्होडाफोन कं, कॉर्नर ते सँडोझ कं. एमआयडीसी परिसर याठिकाणी सखोल स्वच्छता मोहीमे अंतर्गत बारकाईने सफाई करून घेण्यात आली. त्यासोबतच इतरही विभाग कार्यालय क्षेत्रात मोहीम राबविण्यात आली. यामुळे हवेतील धुळीचे प्रमाण कमी झाल्याचे अभिप्राय नागरिकांकडूनच प्राप्त होत असून या सखोल स्वच्छता मोहीमा उपयोगी ठरत असल्याचे निदर्शनास येत आहे.

# थोडक्यात

## रस्ते गुणवत्ता वाढ, वाहतुक व्यवस्थापन व नियोजनविषयक कार्यशाळा संपन्न

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१३, नवी मुंबई :** महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येणाऱ्या स्थापत्य कामांमध्ये नवतंत्रज्ञानाचा समावेश करून कामांमध्ये गुणवत्ता वाढ व्हावी व याचा उपयोग नागरिकांना दर्जेदार सुविधापूर्ती करताना व्हावा. यादृष्टीने नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका मुख्यालयातील ज्ञानकेंद्रात अभियांत्रिकी विभागाच्या वतीने शहर अभियंता शिरीष आरदवाड यांच्या माध्यमातून विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात अधिक चांगल्या दर्जाची रस्तेनिर्मिती तसेच बांधकाम आणि व्यवस्थापन नियोजन या विषयावरील या एक दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेत आयआयटीच्या तज्ज्ञ प्राध्यापकांनी स्थापत्य कामांच्या गुणवत्ता वाढीबाबत सविस्तर आणि अद्यावत माहिती दिली. यामध्ये आयआयटीचे प्रा.धर्मवीर सिंह यांनी बिटुमिनस आणि काँक्रीट रस्त्यांचे बांधकाम व गुणवत्ता, क्षेत्रीय बांधकाम आणि ओव्हरले, व्हाईट-टॉपिंग तसेच प्रगतीपथावरील प्रकल्पांची गुणवत्ता तपासणी पध्दती, रस्त्यांचे क्षेत्रीय मूल्यांकन आणि ओव्हरले, व्हाईट टॉपिंग किंवा बिटुमिनस किंवा इतर कोणत्याही तंत्रांच्या गरजांशी संबंधित मूल्यांकन आणि पदपथ बांधकामाशी संबंधित प्रकल्पांच्या डिझाइन, प्रस्ताव आणि तांत्रिक बाबींचा आढावा अशा विविध विषयांवर अभ्यासपूर्ण भाष्य करीत उपस्थितांच्या माहिती व ज्ञानात भर टाकली. त्याचप्रमाणे आयआयटीचे प्रा.अविजीत माजी यांनी वाहतूक व्यवस्थापन, नियोजन, घटना शोध आणि व्यवस्थापन, रस्ता सुरक्षा ऑडिट, वाहतूक नियंत्रण उपकरणे अशा विविध विषयांच्या अनुषंगाने व्याख्यान देत यामधील बारकावे समजून सांगितले. दोन सत्रात दिवसभर चालणाऱ्या या कार्यशाळेत शहर अभियंता शिरीष आरदवाड, अति.शहर अभियंता अरविंद शिंदे यांच्यासह स्थापत्य, विद्युत, पाणीपुरवठा, मलनि:स्सारण, यांत्रिकी विभागांचे कार्यकारी अभियंते व सर्व अभियंते तसेच रस्ते कंत्राटदार, त्यांचे अभियंते उपस्थित होते.

## कौशल्य संपन्नेतून स्वयंविकास आणि स्वप्न साकार करा-प्रा.मेंढापुरे

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.१३, खंडाळा (सातारा) :** शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या सूचनेनुसार राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० प्रभावी अंमलबजावणी आणि सकारात्मक परिणामकता माहितीसाठी उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांचे प्रबोधन करण्यासाठी स्कुल कनेक्ट संपर्क अभियान अंतर्गत पंचक्रोशी उच्च माध्यमिक विद्यालय जवळे लोहोम फाटा येथे सुशिला शंकरराव गाढवे, खंडाळा अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. प्रदीप मेंढापुरे यांचे महाविद्यालयीन शिक्षणाचे कौशल्यपूर्ण महत्व या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी मार्गदर्शन करताना प्रा. मेंढापुरे म्हणाले-आजचा युवा व पालक शैक्षणिक बदलाविषयी जागृत असून महाविद्यालय शिक्षणातून कौशल्य प्राप्ती निश्चित होते. नव्या शैक्षणिक धोरणनुसार प्रत्येक महाविद्यालय कौशल्य अभ्यासक्रम आधारित अध्ययन-अध्यापन करत असून खंडाळा भागातील विद्यार्थ्यांना खंडाळा विभाग शिक्षण समितीचे सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालय खंडाळा कौशल्य प्राप्तीसाठी एक चांगला पर्याय आहे आणि विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित करून करून लाभ घ्यावा असे आवाहन केले. ग्रामीण भागातील तरुणाईने कौशल्ये प्राप्तीतून स्वयंविकास आणि आपल्या स्वप्नांना बळ द्यावे असे प्रतिपादन केले. या कार्यशाळेचे प्रास्ताविक प्राचार्य डी.व्ही.गायकवाड यांनी, स्वागत इंग्लिश मिडीयम स्कुल मुख्याध्यापक मापारी यांनी सूत्रसंचालन प्रा.संजय नेवसे यांनी केले. आभार सोनवणे यांनी मानले. यावेळी प्रा.अनिकेत गायकवाड, उच्च माध्यमिक विद्यार्थी विद्यार्थिनीची उपस्थिती होती

## उद्योजकता प्रेरणा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा

**अक्षराज : अशोक कुलकर्णी**



**दि.१२, कळंब (धाराशिव) :** जीवन जगण्याची पद्धत, कार्य आणि विचार हि यशस्वी लोकांची त्रिसूत्री आहे असे प्रतिपादन प्रमुख वक्ते बळीराम कवडे यांनी संत श्रेष्ठ गोरोबा काका शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था कळंब येथील राष्ट्रीय युवा दिनानिमित्त आयोजित उद्योजकता प्रेरणा कार्यक्रमात केले. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग अंतर्गत व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचानालयाच्यावतीने कळंब येथील संत श्रेष्ठ गोरोबा काका शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये दिनांक १२ जानेवारी २०२५ रोजी जिजाऊ माँ साहेब आणि स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून उद्योजकता प्रेरणा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे प्राचार्य केशव पवार हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्था व्यवस्थापन समितीचे चेअरमन एस आर साखरे, संस्था व्यवस्थापन समितीचे सदस्य कापसे आर एम, करडे जी बी, झोरी पी बी, शिक्षिका आशा राऊत-सुरवसे हे होते. या कार्यक्रमात बोलताना प्रमुख वक्ते आशा राऊत-सुरवसे यांनी जिजाऊंनी शिवराय यांच्यावर केलेले संस्कार, इतिहासामधे असलेले स्त्री शिक्षणाचे महत्त्व याबद्दल सांगितले. तसेच स्वामी विवेकानंद आणि जिजाऊ माँ साहेब यांचे विचार आत्मसात करावे असे त्यांनी सांगितले.

राष्ट्रीय युवा दिनानिमित्त प्रशिक्षणार्थी याच्या कलागुणांना वाव मिळवा आणि त्यांच्या अंगी खेळाडू वृत्ती निर्माण व्हावी याकरीता संस्थेत दिनांक ९ ते ११ मध्ये विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये चित्रकला, निबंध लेखन, रांगोळी स्पर्धा आणि गोळाफेक, १०० मीटर धावणे, कॅरम, बुद्धिबळ इत्यादी खेळ घेण्यात आले होते. कार्यक्रम संपल्यानंतर विविध स्पर्धेमध्ये यशस्वी उमेदवारांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शिल्पनिदेशक सुजित दंडनाईक, प्रास्ताविक शिल्पनिदेशक कोमल मेंडके तर आभार प्रदर्शन शिल्पनिदेशक अक्षय सुतार यांनी केले.

हा कार्यक्रम पार पाडण्यासाठी संस्थेचे प्राचार्य केशव पवार यांच्या मार्गदर्शनाखाली गटनिदेशक शामकांत डोंगे, शिल्पनिदेशक अंकूश माळकर, नितेश पडघन, वसंत टोपे, नदीम शेख, मंचक जाधव, बालाजी पांचाळ, शिल्पनिदेशिका गोदावरी वडजकर, रंजना फुलारी, ज्योती शिंदे, कल्याणी भराटे, वरिष्ठ लिपिक विलास सुरवसे, भांडारपाल बाजीराव राउत व चतुर्थ श्रेणी कर्मचारी पप्पु मडके यांनी परिश्रम घेतले. यावेळी संस्थेचे सर्व प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.